दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार, 23 फेब्रुवारी 2026 | | अंक क्र. 275 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''

हॉटेल बालाजी

ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



# आता दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ सुलभ

## दिव्यांगांसाठी डिजिटल क्रांती; 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल'चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन




**मुंबई | प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ सुलभ, पारदर्शक आणि वेळेत मिळावा या उद्देशाने दिव्यांग कल्याण विभागाने विकसित केलेले एकात्मिक 'दिव्यांग सहाय्यक पोर्टल' आणि मोबाईल ॲपचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आले. या डिजिटल उपक्रमामुळे दिव्यांगांसाठी सेवा वितरण अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांसह मंत्रिमंडळातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दिव्यांग नागरिकांचा सर्वांगीण विकास, त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेणे आणि स्वावलंबी बनविणे हे शासनाचे प्राधान्य असून तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून निर्णयप्रक्रिया अधिक गतिमान होईल. पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजना वेळेत पोहोचतील आणि दिव्यांगांच्या 'ईज ऑफ लिव्हिंग'मध्ये लक्षणीय वाढ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या पोर्टलमुळे दिव्यांग व्यक्तींना घरबसल्या ऑनलाईन अर्ज करता येणार असून अर्जाची स्थिती रिअल-टाइममध्ये पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. विविध शासकीय योजना, सेवा आणि लाभांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यात आल्याने दिव्यांग, त्यांचे पालक आणि संस्था यांना शिक्षण, कौशल्य विकास व पुनर्वसनाचे नियोजन करणे अधिक सुलभ होणार आहे.

सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सुविधा आणि व्हॉइस नोट्सद्वारे तक्रार निवारण ही या पोर्टलची मोठी ताकद आहे. टायपिंग करण्यात अडचण असलेल्या दिव्यांगांना व्हॉइस नोटद्वारे तक्रार नोंदवता येणार असून एआय-आधारित व्हॉट्सॲप चॅटबॉटमुळे संवाद अधिक संवेदनशील आणि सोपा होणार आहे.

### पोर्टलची ठळक वैशिष्ट्ये:

- **थेट लाभ हस्तांतरण (DBT) : आधार आणि UDID पडताळणीमुळे पात्र दिव्यांगांनाच योजनांचा लाभ**
- **एआय व व्हॉइस नोट्सद्वारे तक्रार निवारण प्रणाली**
- **सर्व योजना, सेवा आणि लाभ एकाच डिजिटल प्लॅटफॉर्मवर**
- **बनावट व दुबार लाभार्थ्यांना आळा घालण्यासाठी API आधारित पडताळणी**
- **UDISE डेटाच्या आधारे गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शासनाची थेट पोहोच**
- **पहिल्या टप्प्यात ४ मॉड्यूल्स कार्यान्वित – योजना वितरण, संस्था व्यवस्थापन, तक्रार निवारण व डॅशबोर्ड**
- **पुढील टप्प्यात ॲक्सेसिबिलिटी ऑडिट आणि अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सेवा सुरू होणार**
- **या डिजिटल उपक्रमामुळे दिव्यांगांना कोणत्याही कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही, तर सर्व सेवा त्यांच्या 'फिंगर टिप्स'वर उपलब्ध होतील. परिणामी प्रशासनातील पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वास वाढून दिव्यांग सक्षमीकरणाच्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलल्याचे मानले जात आहे.**

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळा संपन्न

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात संशोधन पद्धती या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर देशमुख व साधन व्यक्ती म्हणून डॉक्टर गोपाल कुलकर्णी ,रिसर्च कन्सल्टंट पुणे यांनी मार्गदर्शन केले.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालय पातळीवरील संशोधन प्रकल्पास अधिक महत्त्व दिलेले आहे. तसेच अनेक सामाजिक संस्थांमध्ये निधी उपलब्ध करून देणाऱ्या संस्थांना सामाजिक विषयांवर प्रकल्प तयार करून विविध फंडिंग एजन्सी ना पाठवण्याचे कौशल्य विकसित व्हावे या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




उद्घाटन प्रसंगी मांडणी करतांना प्राचार्य देशमुख यांनी संशोधनातील गृहीतकृत्य किती जबाबदारीने तपासावे लागते यावर उदाहरण देऊन विवेचन केले. कार्यशाळेस मार्गदर्शन करतांना डॉ.गोपाल कुलकर्णी यांनी प्रकल्प कसा लिहिला जावा , त्याचे उद्देश आणि पडताळणी यावर समग्र व सोप्या भाषेत सविस्तर अशी विविध सत्र घेतली.

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयातील संशोधन केंद्राच्या वतीने ही कार्यशाळा घेण्यात आली होती या संशोधन केंद्रातून आत्तापर्यंत 36 संशोधक विद्यार्थी यांना पीएचडी मिळाली असून वीस विद्यार्थी संशोधनार्थ कार्यरत आहेत . या कार्यशाळेचे प्रास्ताविक संशोधन केंद्राच्या संचालिका डॉ. अरुंधती पाटील यांनी मांडले तर आभार प्रा.नजीर शेख यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेस बावन संशोधक विद्यार्थी , प्राध्यापक व समाजसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# अडीच वर्षांच्या शार्विलची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये झेप

## आयबीआर ॲचिव्हर किताबाने सन्मानित



**महागाव** : जिद्द, चिकाटी आणि अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर वय केवळ २ वर्षे ३ महिने असताना शार्विल उमेश ठाकरे या चिमुकल्याने आपल्या विलक्षण स्मरणशक्तीने सर्वांना थक्क केले आहे. शार्विलच्या या अचाट कौशल्याची दखल घेत `इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स` ने त्याला आयबीआर ॲचिव्हर या प्रतिष्ठेच्या किताबाने सन्मानित केले आहे.

महागाव तालुक्यातील उटी येथील शार्विलने वयाच्या अवघ्या २ वर्षे ३ महिन्यांत विविध विषयांवरील माहिती आत्मसात करून ती सफाईदारपणे सादर केली. त्याच्या या कामगिरीची सखोल पडताळणी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या संपादकीय मंडळाकडून करण्यात आली. शार्विलने विविध घटकांची अचूक ओळख पटवून आपली तल्लख बुद्धिमत्ता सिद्ध केली .ज्यामध्ये त्याने २२ वन्य प्राणी, ८ भाज्या, ११ फळे, ५ फुले आणि ५ पक्षी, ३० भारतीय स्वातंत्र्यसैनिक, ६ मराठा सरदार व त्यांची राजवंशे, आणि महाराष्ट्रातील ६ प्रादेशिक फळे, १७ विविध वाहने आणि वर्षातील सर्व महिने यांची ओळख पटविली त्याच प्रमाणे त्याने अत्यंत कमी वयात त्याने `शिवस्तुती` आणि `महामृत्युंजय मंत्र` यांचेही पाठांतर केले आहे.

७ नोव्हेंबर २०२३ रोजी जन्मलेल्या शार्विलने इतक्या लहान वयात मिळवलेले हे यश त्याच्या पालकांच्या कष्टाचे आणि शार्विलच्या एकाग्रतेचे फळ मानले जात आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याच्या या विक्रमावर इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने अधिकृत मोहोर उमटवली. या यशामुळे संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यातून आणि ठाकरे परिवारावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

"शार्विलचा हा प्रवास आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याच्यातील जिज्ञासा आणि शिकण्याची ओढ त्याला भविष्यात नक्कीच मोठ्या शिखरावर घेऊन जाईल," अशा भावना त्याच्या हितचिंतकांनी व्यक्त केल्या आहेत.

# सनराईज स्कूलची शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचाल गौरवास्पद : नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी

## उत्तुंग भरारी घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांच्या पंखांना बळ द्यावे– अभिनेत्री प्रेरणा खरात

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

परिवर्तन युवा मंच संचलित, सनराईज इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, परळी-वैजनाथ यांचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या दिमाखदार सोहळ्याने परळीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना परळी नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी म्हणाल्या की, सनराईज स्कूलची शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचाल अत्यंत गौरवास्पद आहे. परळी शहराच्या नावलौकिकात भर घालणारे उत्तम विद्यार्थी या संस्थेतून घडतील असा मला विश्वास आहे.असे सांगून शाळेचे कौतुक केले.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरलेल्या मिस इंडिया स्माईल अवॉर्ड विनर, मॉडेल व अभिनेत्री प्रेरणा खरात यांनी आपल्या भाषणात उत्तुंग भरारी घेण्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांच्या पंखांना बळ देऊन त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहावे असे आवाहन करत

सनराईजचे स्नेहसंमेलन म्हणजे केवळ कार्यक्रम नसून तो उत्साह, कला आणि संस्कृतीचा एक सुंदर संगम आहे, असे प्रतिपादन केले.






मंचावर नगरअध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी ,कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, अभिनेत्री व मॉडेल प्रेरणा खरात, सिने-नाट्य अभिनेता, लेखक व दिग्दर्शक डॉ. सिद्धार्थ तायडे ,पंचायत समितीचे सभापती बालाजी (पिंटू) मुंडे,भगवान सेनेचे प्रदेश अध्यक्ष माणिकभाऊ फड, नगर परिषद बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे,परळी शहर पोलीस स्टेशनचे एपीआय नितीन गट्टूवार,तलाठी श्यामसुंदर गित्ते,संस्थेचे अध्यक्ष गोविंदरावजी मुंडे ,सचिव सौ. प्रियतमा मुंडे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र चाटे,उद्धव कराड ,फुलचंद मुंडे,प्राचार्य प्रदीप खताळ आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती

या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, लोकगीते आणि बॉलिवूडमधील गाण्यांवर एकापेक्षा एक सरस नृत्याविष्कार करत रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले . विद्यार्थ्यांच्या या दर्जेदार सादरीकरणाने उपस्थित पालकांची आणि प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सिद्धार्थ तायडे यांनी केले, तर सूत्रसंचालन रुईकर मॅडम यांनी प्रभावीपणे निभावले. शेवटी संस्थेच्या सचिव सौ. प्रियतमा मुंडे यांनी अनोख्या शैलीत कृतज्ञतापूर्वक सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# मुलांना तणावमुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

# अश्विन शेठ ग्रुपकडून साउथ मुंबई पोर्टफोलिओचा विस्तार

YM इन्फ्रा यांनी अश्विन शेठ ग्रुपसोबतच्या धोरणात्मक सहकार्यांतर्गत मरीन लाईन्स, साउथ मुंबई येथे 74 मजली लक्झरी निवासी प्रकल्प 'वन मरीना'च्या लॉन्चची घोषणा केली. सुमारे 15 लाख चौ.फु. विकास क्षेत्र आणि अंदाजे ₹800 कोटी ग्रॉस डेव्हलपमेंट व्हॅल्यू असलेला हा प्रकल्प आपल्या मायक्रो-मार्केटमधील सर्वात उंच निवासी टॉवर ठरणार आहे. गेल्या काही वर्षांत साउथ मुंबईमध्ये मोठ्या प्रकल्पांची संख्या मर्यादित राहिल्यामुळे, वन मरीनाची उंची आणि प्रमाण विकासाच्या नव्या टप्प्याचे द्योतक आहे. या प्रकल्पात रहिवाशांना आयुष्यभर अबाधित समुद्रदृश्य मिळणार आहे.या प्रकल्पात 2, 3 आणि 4 बेडरूम निवासस्थानांसह डुप्लेक्स आणि पेंटहाऊसचा समावेश आहे. तिकीट आकार ₹7 कोटी ते ₹5 कोटी दरम्यान असणार आहे. प्रति मजला सुमारे सहा निवासस्थानांसह लो-डेनसिटी लेआउट गोपनीयता आणि विशेषत्वाला प्राधान्य देते. 95% अपार्टमेंट्स अरबी समुद्राकडे उन्मुख आहेत. समुद्रसपाटीपासून 131 फूट उंचीवर पहिला निवासी मजला असल्याने विस्तृत आणि अखंड समुद्रदृश्य मिळते. न्यूयॉर्कच्या Billionaire's Row पासून प्रेरित लक्झरी सुविधा 69 व्या आणि 70 व्या मजल्यावर असतील.



# पीएनजीएस रेवा डायमंडचा आयपीओ, २४ फेब्रुवारी २०२६ पासून खुला




पीएनजीएस रेवा डायमंड ज्वेलरी लिमिटेडने स्मार्ट होरायझन कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या (पूर्वीचे श्रेणी कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड) सल्ल्याने, आपल्या पहिल्या सार्वजनिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) प्रति शेअर ₹६७ ते ₹८६ चा किंमतपट्टा निश्चित केला आहे. या शेअर्सचे दर्शनी मूल्य प्रत्येकी ₹० आहे. कंपनीचा आयपीओ मंगळवार, २४ फेब्रुवारी २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होईल आणि गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान ३२ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३२ च्या पटीत बोली लावू शकतात.

आयपीओपूर्व आणि प्राईस बँड जाहिरातीच्या तारखेनुसार आऊटस्टँन्डिंग इक्विटी शेअर्सची संख्या २,१८६६,४०० (दर्शनी मूल्य ₹०) इतकी आहे. हा आयपीओ ₹,८०० दशलक्ष पर्यंतचा नवीन इश्यू आहे.निधीचा वापर: या नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ₹,८६५.६४ दशलक्षचा वापर १५ नवीन स्टोअर्स उभारण्यासाठी केला जाईल. तसेच, ₹५४.०० दशलक्ष या १५ नवीन स्टोअर्सच्या लाँचशी संबंधित विपणन (Marketing) आणि प्रचारात्मक खर्चासाठी वापरले जातील, ज्याचा उद्देश 'रेवा' या फ्लॅगशिप ब्रँडची स्थानिक जागरूकता आणि दृश्यमानता वाढवणे हा आहे. उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी वापरली जाईल.

# क्लीनमॅक्स एनव्हायरो एनर्जी सोल्युशन्सचा आयपीओ आज खुला होणार

भारतातील सर्वात मोठी व्यावसायिक आणि औद्योगिक अक्षय ऊर्जा पुरवठादार कंपनी 'क्लीनमॅक्स'ने आपल्या पहिल्या सार्वजनिक विक्रीसाठी (आयपीओ) शेअर १००० ते १०५३ रुपये किंमतपट्टा निश्चित केला आहे. या शेअर्सचे दर्शनी मूल्य प्रत्येकी १ रुपया आहे. कंपनीचा आयपीओ २३ फेब्रुवारी २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होईल आणि २५ फेब्रुवारी २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान १४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर १४ च्या पटीत बोली लावू शकतात.हा आयपीओ १२ कोटी रुपयांपर्यंतचा नवीन इश्यू आणि प्रवर्तक कुलदीप जैन, BGTF One Holdings (DIFC) Limited आणि KEMPINC LLP यांच्याद्वारे १९ कोटी रुपयांपर्यंतच्या 'ऑफर-फॉर-सेल'चा समावेश आहे. इतर विक्री करणाऱ्या गुंतवणूकदारांमध्ये Augment India I Holdings, LLC आणि DSDG Holding APS यांचा समावेश आहे.नवीन इश्यूमधून मिळणाऱ्या १,१२२.६ कोटी रुपयांचा वापर कंपनी आणि/किंवा त्यांच्या उपकंपन्यांच्या थकीत कर्जाची पूर्ण किंवा अंशतः परतफेड करण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी केला जाईल. प्रस्तावित आयपीओपूर्वी कंपनीने १५०० कोटी रुपये यशस्वीरित्या उभे केले आहेत.




# ऑस्ट्रेलियाचा सर्व भारतीय निर्यातीला शुल्कमुक्त प्रवेश



"वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई आणि ऑस्ट्रेलिया इंडिया बिझनेस कौन्सिल यांच्यात स्वाक्षरी झालेल्या सामंजस्य करारामुळे द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणूक सहकार्य आणखी मजबूत होईल, ज्यामुळे दोन्ही देशांमधील व्यवसायांसाठी नवीन संधी निर्माण होतील" असे डॉ. विजय कलंत्री, अध्यक्ष, वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई आणि अध्यक्ष, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज यांनी म्हटले आहे.

वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज च्या सहकार्याने ऑस्ट्रेलिया इंडिया बिझनेस कौन्सिलच्या व्यावसायिक शिष्टमंडळासोबत उच्चस्तरीय संवादाचे आयोजन केले होते, ज्यामुळे भारत-ऑस्ट्रेलिया आर्थिक संबंधांमधील वाढत्या गतीची पुष्टी झाली. या भेटीमध्ये द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक सहकार्य आणि महत्त्वाच्या खनिजे, हरित ऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञान यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये क्षेत्रीय भागीदारी वाढविण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले.

ऑस्ट्रेलिया इंडिया बिझनेस कौन्सिलचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. दीपक राज गुप्ता ओएएम म्हणाले, "आमचे लक्ष दोन्ही अर्थव्यवस्थांचा कणा असलेल्या लघु आणि मध्यम आकाराच्या उद्योगांना पाठिंबा देण्यावर आहे. आजचे २० सदस्यांचे शिष्टमंडळ, शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता, कायदा, क्रीडा, लॉजिस्टिक्स, तंत्रज्ञान आणि वित्त यासारख्या क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करते, जे भारत-ऑस्ट्रेलिया द्विपक्षीय कॉरिडॉरमध्ये उदयास येणाऱ्या विस्तृत संधींचे प्रतिबिंबित करते."**संकलन –संयोजन: सुबोध रणशेवरे**

# संत गाडगे बाबा : समाजजागरणाचा दीपस्तंभ

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी जन्माला आली आहेत की ज्यांनी कोणतीही सत्ता, राजकीय पद, संपत्ती किंवा संघटनात्मक बळ न वापरता समाजमनावर खोलवर आणि दीर्घकालीन प्रभाव टाकला आहे. ही व्यक्तिमत्त्वे लोकांच्या जीवनाशी एकरूप झाली, त्यांच्या दु:खांशी संवाद साधला आणि कृतीतून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. अशाच थोर समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी, पण अत्यंत साधा दीप म्हणजे संत गाडगे बाबा होय. २३ फेब्रुवारी हा दिवस त्यांच्या जयंतीचा असला तरी तो केवळ एका संताचा जन्मदिन नाही, तर सामाजिक स्वच्छता, मानवतावाद, विवेकनिष्ठ अध्यात्म, श्रमप्रतिष्ठा आणि समतेच्या मूल्यांचा सार्वजनिक उत्सव आहे. संत गाडगे बाबांचे जीवन हे वैयक्तिक मोक्षसाधनेपेक्षा सामाजिक उद्धारासाठी समर्पित होते.

संत गाडगे बाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डेबूजींना बालपणापासूनच दारिद्र्य, कष्ट, उपासमार आणि सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण फारसे मिळाले नाही, परंतु जीवनाच्या शाळेतून त्यांनी जे शिक्षण घेतले ते अत्यंत व्यापक, खोल आणि समाजपरिवर्तनाची दिशा देणारे होते. लहान वयातच त्यांनी ग्रामीण समाजातील अस्वच्छता, अंधश्रद्धा, दारूचे व्यसन, जातिभेद, कर्मकांड आणि स्त्रियांची दुर्दशा यांचे विदारक चित्र पाहिले. या वास्तवाने त्यांचे मन अस्वस्थ झाले आणि हीच अस्वस्थता पुढे समाजप्रबोधनाची प्रेरणा ठरली.

गाडगे बाबांचे आयुष्य पारंपरिक अर्थाने संन्यस्त नव्हते. त्यांनी कोणताही मठ स्थापन केला नाही, आश्रम उभारला नाही किंवा औपचारिक शिष्यपरंपरा चालवली नाही. त्यांच्या हातात ग्रंथाऐवजी झाडू होती, अंगावर फाटकी वस्त्रे होती आणि चेहऱ्यावर समाजासाठी झिजणाऱ्या माणसाचे तेज होते. त्यांनी लोकांना सांगितले की देव दगडात नाही, तो माणसात आहे; पूजा कर्मकांडात नाही, ती सेवेत आहे; आणि अध्यात्म पलायनात नाही, तर समाजाशी बांधिलकी ठेवण्यात आहे. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन गावोगावी सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली आणि स्वच्छतेला नैतिक व आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले.

स्वच्छता हा संत गाडगे बाबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता, पण ती केवळ भौतिक स्वच्छतेपुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता म्हणजे विचारांची, वर्तनाची आणि सामाजिक रचनेची स्वच्छता होती. अस्वच्छ परिसर म्हणजे रोगांना आमंत्रण, रोग म्हणजे दारिद्र्य आणि दारिद्र्य म्हणजे अज्ञान, अशी साखळी त्यांनी लोकांना समजावून सांगितली. स्वच्छता म्हणजे आरोग्य, आणि आरोग्य म्हणजेच समाजाचा खरा धर्म, ही त्यांची ठाम भूमिका होती. आज स्वच्छतेवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होते, परंतु शंभर वर्षांपूर्वी गाडगे बाबांनी ही चळवळ प्रत्यक्ष कृतीतून सुरू केली होती.

गाडगे बाबांचे समाजप्रबोधन हे भाषणांपुरते मर्यादित नव्हते. ते स्वतः नाल्या साफ करत, कचरा उचलत, धर्मशाळा, बाजारपेठा आणि यात्रास्थळे स्वच्छ करत आणि त्याच वेळी लोकांशी संवाद साधत. त्यांच्या कीर्तनांमध्ये



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

चमत्कार, अवतारकथा किंवा भीतीवर आधारित धर्म नव्हता. त्यांच्या कीर्तनांचा केंद्रबिंदू होता शिक्षण, विवेक, व्यसनमुक्ती, जातिभेदाचा निषेध आणि स्त्रीपुरुष समानता. साध्या, लोकभाषेतील उदाहरणांनी ते गंभीर सामाजिक प्रश्न मांडत आणि त्यामुळे सामान्य माणसाला ते आपले वाटत.

दारूचे व्यसन हे ग्रामीण समाजाच्या अध:पतनाचे एक मोठे कारण आहे, हे गाडगे बाबांनी अचूक ओळखले होते. दारूमुळे कुटुंब उद्ध्वस्त होते, महिलांवर अत्याचार वाढतात, मुलांचे शिक्षण बिघडते आणि आर्थिक परिस्थिती ढासळते. म्हणूनच त्यांनी दारूबंदीचा आग्रह धरला. त्यांनी व्यसन करणाऱ्यांवर टीका केली, पण द्वेष केला नाही. परिवर्तन हे दंडाने नव्हे, तर प्रबोधनाने होते, हा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या प्रभावामुळे अनेक गावांमध्ये दारूची दुकाने बंद झाली आणि व्यसनमुक्तीचे वातावरण निर्माण झाले.

शिक्षणाबाबत गाडगे बाबांची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि दूरदृष्टीची होती. "विद्या विणा मती गेली, मती विणा नीती गेली, नीती विणा गती गेली, गती विणा वित्त गेले," या ओळींमधून त्यांनी शिक्षणाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी किंवा पद मिळवण्याचे साधन नसून विवेक, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे, असे ते मानत. त्यांनी गरीब, अनाथ आणि वंचित मुलांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला आणि अनेक शाळा, वसतिगृहे व शैक्षणिक उपक्रमांना मदत केली.

जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींवर गाडगे बाबांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली. त्यांनी सर्व माणसे समान आहेत, ही भूमिका केवळ शब्दांत न ठेवता कृतीतून दाखवली. त्यांनी दलित वस्त्यांमध्ये जाऊन स्वच्छता केली, त्यांच्या सोबत भोजन केले आणि त्यांना माणूस म्हणून सन्मान दिला. देव जर सर्वांचा निर्माता असेल, तर माणसामाणसात भेद कसा, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला. त्यांच्या विचारांमध्ये संत तुकाराम, संत कबीर आणि महात्मा फुले यांच्या परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

स्त्रियांच्या प्रश्नांबाबतही गाडगे बाबांची भूमिका प्रागतिक होती. त्यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले, बालविवाहाचा निषेध केला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. समाजाचा खरा विकास तेव्हाच होतो, जेव्हा स्त्रियांना सन्मान, शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळते, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्त्रीपुरुष समानतेचा संदेश दिला आणि कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे महत्त्व अधोरेखित केले.

गाडगे बाबांचे अध्यात्म कर्मकांडविरहित आणि विवेकनिष्ठ होते. उपास, व्रत, तीर्थयात्रा यांपेक्षा उपाशी माणसाला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि अज्ञान दूर करणे हेच खरे पुण्यकर्म आहे, असे ते मानत. त्यांनी अंधश्रद्धेचा तीव्र निषेध केला आणि श्रद्धेला विवेकाची जोड दिली. त्यांचे अध्यात्म माणसाला माणूस बनवणारे होते.

गाडगे बाबांचे जीवन म्हणजे सतत चालत राहण्याचे, भटकंतीचे जीवन होते. त्यांच्या पायात चप्पल नव्हती, डोक्यावर छत्री नव्हती, आणि खांद्यावर एक झोळी होती. या झोळीतून त्यांनी लोकांकडून मिळालेला पैसा स्वतःसाठी कधीही वापरला नाही. तो पैसा समाजकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंना मदतीसाठी खर्च केला. त्यांनी संपत्ती साठवली नाही, कारण त्यांच्या मते समाजसेवेतच खरे वैभव आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यात एकाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली नाही : प्रा डॉ विनोद जगतकर

## छत्रपती शिवरायांचे प्रशासन कार्य हे सर्वांनीच अभ्यासावे : प्रा प्रसाद देशमुख








**परळी वैजनाथ | (प्रतिनिधी)**

स्वराज संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात शेतकऱ्यांच्या शेतातील देटालाही धक्का लागणार नाही याची काळजी घेतली जात होती. स्वराज्यात शेतकऱ्यांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती, यामुळे स्वराज्यात एकाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केली नाही असे प्रतिपादन प्रा डॉ विनोद जगतकर यांनी केले. ते येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने आयोजित हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती निमित्त कार्यक्रमात बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, संस्थेचे सचिव रवींद्र देशमुख , कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती तर प्रमुख वक्ते इतिहास विभाग प्रमुख डॉ विनोद जगतकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना प्रा डॉ विनोद जगतकर यांनी छत्रपती शिवरायांच्या जीवनातील अनेक प्रेरक प्रसंग सांगितले, छत्रपती शिवाजी महाराज भारतीय आरमाराचे जनक व प्रजेला खरा न्याय देणारा हा राजा होता, देशातील नागरीकांसाठी नाही तर जगातील नागरीकांसाठी ते प्रेरणास्रोत होते. प्रा प्रसाद देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप करताना शिवराय हे अत्यंत कुशल प्रशासक असून ते विज्ञानवादी दृष्टीकोणाचे होते असे सांगून सर्वांनी शिवरायांच्या जीवनकार्याचे अध्ययन करून प्रेरित होऊन तसे वागण्याचा प्रयत्न करावा असे विचार या प्रसंगी मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कनिष्ठ विभाग कार्यक्राधिकारी प्रा प्रवीण फुटके यांनी केले. त्यांत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी जनतेचा स्वाभिमान जागृत केला असे सांगितले. सूत्रसंचालन डॉ विवेकानंद कवडे यांनी केले तर आभार प्रकटन वरिष्ठ महाविद्यालय रासेयोच्या प्रा डॉ संगिता कचरे यांनी केले.याप्रसंगी महाविद्यालयातील वरिष्ठ विभाग रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ विवेकानंद कवडे , डॉ गुट्टे, प्रा डॉ संगिता कचरे , यांच्यासह सर्वच अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राज्य बालनाट्य स्पर्धेत बेला नाटकाला द्वितीय पारितोषिक

## सहा वैयक्तीक बक्षीसे, उत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून शेख आसीफ यांचा सन्मान

**परळी | प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या २२ व्या राज्य बालनाटय स्पर्धेत बेला नाटकाला द्वितीय पारितोषिक मिळाले असून या नाटकाने अंतिम फेरीत स्थान मिळविले आहे. या सह बेला नाटकातील कलावंतांना सहा वैयक्तीक बक्षीसे मिळाली आहे.

पहिल्यांदाच परळी येथील नाटकाला सात बक्षीस मिळाले आहे. छत्रपती सेवाभावी संस्थेच्या वतीने बेला नाटकाने संभाजीनगर विभागांतर्गत हे यश मिळविले आहे. या नाटकाचे उत्कृष्ट दिग्दर्शन आसीफ शेख यानी केले असुन बाल कलाकारांनी जबरदस्त मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवून दिले आहे. या नाटकाच्या दिग्दर्शनासाठी आसीफ शेख यांना द्वितीय बक्षीस मिळाले तर संगीतसाठी अतुल साळवे यांना द्वितीय बक्षीस, वेशभूषेसाठी अनिल गोटमोकले यांना द्वितीय बक्षीस, प्रकाश योजनेसाठी मानिकचंद थोरात यांनातृतीय बक्षीस, रंगभूषासाठी विश्रांत लशकारे यांना तृतीय बक्षीस मिळाले आहे. सारा गित्तेयांना अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र मिळाले. एकूण ४९ नाटकात या नाटकाने दुसरे स्थान मिळविले आहे. नाटकात भेल सेकंडरी स्कूलचे कलाकार त्रिशा यादव, सारा गीत्ते, आयुष पीसे, वरद चाटे, शिवम चाटे, आर्यवर्धन फड अजय शिंदे, मयुरेश खोत, प्रणव चव्हाण, महेश नागरगोजे, पार्थ कासार,अर्जुन भताने, अर्नव मुंडे, वेदप्रकाश कावरे, स्वरा घुगे, ईश्वरी शेळके, स्नेहल शेळके यांनी अभिनय केला. प्रकाश योजना माणिकचंद थोरात, संगीत अतुल साळवे, नेपथ्य शेख अकबर, रंगभूषा विश्रांत लशकारे, वेशभूषा अनिल गोटमोकले रंगमंच व्यवस्था रोहिणी वाकडे, राहुल सुर्यवंशी यांनी केले.या यशाबद्दल भेल शाळेचे प्राचार्य गीरीष ठाकुर यासह शिक्षक व पालकांनी शुभेच्छा दिल्या.

# सामाजिक योगदानासाठी पंखात सामर्थ्य बाळगा

## विद्यापीठ परीक्षा संचालक हुशारसिंग साबळे



**नांदेड | प्रतिनिधी**

पत्रकारितक्षेत्राला वर्षानुवर्षांची अनमोल परंपरा आहे. आपल्या देशात जुन्या काळात अनेक मान्यवरांनी समाजाभिमुख निर्भीड आणि परखड पत्रकारिता केली. त्या काळात पत्रकारितेची पारंपरिक शिक्षण व्यवस्था अस्तित्वात नव्हती. मात्र आज तुमच्यासारखे विद्यार्थी अद्यावत शिक्षण घेऊन पत्रकारितेच्या अथांग विश्वात झेपावण्यासाठी सज्ज झालेले आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील प्रगतीचे एकेक क्षेत्र काबीज करत असताना समाजाच्या जडणघडणीसाठी अत्युच्च योगदान देण्याची जबाबदारी पेलण्याचे सामर्थ्य पंखात बाळगा, असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले. श्री गुरुगोविंद सिंगजी पत्रकारिता महाविद्यालयाचा महाविद्यालयाचा पदवी वितरण समारंभ पार पडला. यावेळी प्रमुख मार्गदर्शन करताना हुशारसिंग साबळे बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विकास कदम समारंभाचे अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे अवर सचिव विकास तु. कदम, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. शेखर घुंगरवार, श्री संत नामदेव महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव डॉ. देवदत्त देशपांडे पदवी वितरण समारंभाला उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते प्रारंभी समारंभाचे उद्घाटन झाल्यानंतर विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्राचार्य डॉ. विकास कदम यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख उपस्थितांच्या मार्गदर्शनानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते पदवी वितरित करण्यात आल्या. विशेष म्हणजे नुकत्याच झालेल्या नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या नवनिर्वाचित नगरसेविका राजश्री गोडबोले राक्षसमारे यांनी स्वतः या समारंभात पदवी स्वीकारली. सुमारे ६० विद्यार्थ्यांना बी. ए. (एम. सी. जे.), बी. जे. एम. एस. आणि एम.जे. एम. एस. पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या पदवीचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. अमोल धुळे यांनी केले. आभार प्रदर्शन नितीन नरवाडे यांनी केले. पदवी वितरण कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. सुरेश पाटील, डॉ. शुद्धोधन एडके, प्रा. अमोल धुळे, प्रा. संजय नरवाडे, प्रा. रवींद्र सिंग मोदी, प्रा. विपिन कदम, प्रा. रूपाली वागरे, प्रा. सोनम खोडके, प्रा. प्रतीक्षा चवणे, प्रा. रंजना बहादुरे, प्रा. बुद्धमाला हिंगोले, अनिल विनायते, विलास वाळकीकर, भरत सोनटक्के, फोटोग्राफर रोहन कहाळेकर, कुणाल भुरे आदींनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.



# सहा वर्षीय सय्यद हसनैन हंजला यांचा जीवनाचा पहिला रोजा पुर्ण

**परळी वै (प्रतिनिधी)**

पवित्र रमजान महिन्यातील पहिला रोजा च्या निम्मित सय्यद हसनैन हंजला हा नाजेर हुसेन यांच नातु असुन वयाच्या 6 व्या वर्षी जीवनातील पहिला रोजा ठेवुन सर्वांसमोर आदर्श ठेवला आहे.

सय्यद हसनैन हंजला यांनी आज उन्हाच्या तापमानात वाढ झाली आहे तरी या चिमुकल्यांनी दिवसभर पाण्याचा थेंब न पिता रोजा पुर्णपणे केल्याबद्दल परळी येथील मित्र परिवार व नातेवाईका कडुन अभिनंदन होत आहे. यांनी रमजान महिन्यात 14 तासांचा कडक रोजा धरला. त्यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# माझे शहर माझी जबाबदारीचा स्वच्छता वॉक

**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव महानगरपालिका आरोग्य विभाग, पर्यावरण दूत, आरोग्य विभाग सहकार्याने शहरातील विविध परिसरात जाऊन स्वच्छतेची जनजागृती चा उपक्रम आज दि २१ फेब्रुवारी रोजी हाउसिंग सोसायटीतील परिसरात संपन्न झाला.

प्रभाग ६ चे नगरसेवक दीपक सूर्यवंशी आणि नगरसेविका सुचिता हाडा यांच्या समवेत आजचा स्वच्छतेचा वॉक नंबर ७ नयनतारा मॉल पासून रोझ गार्डन , जिल्हा न्यायालयाचा मागील परिसर नंतर हौसिंग सोसायटी मार्गे पूर्ण २ तासाचा वॉक झाला.

यामध्ये साधारण पणे १०० च्या वर नागरिक उपस्थित होते. स्वच्छता वॉक या अनुष्ठाने रस्त्यावर कचरा टाकणारे याच्या मानसिकतेबद्दल चर्चा झाली. आमच्याकडे 2 दिवस घंटा गाडी येत नाही असे नगरपालिकेचे कर्मचारी यांना प्रश्न विचारले असता नगरपालिका याचे मेंटेन्स साठी गाडी उपलब्ध न्हवती



म्हणून येऊ शकले नाही. तरी एक दोन दिवस गाडी जर नाही आली तर प्रशासनाची अडचण समजून कचरा थोडा एक दिवस साठवला आणि दुसरे दिवशी दिले तर काही हरकत नाही असे बरेच नागरिकांनी सुचवले. एडव्होकेट नारायण लाठी यांनी कोर्ट समोरील गटारीचा प्रश्न नगरसेविका सुचिता मॅडम आणि नगरसेवक दीपक सूर्यवंशी यांना सुचवले.

येत्या दोन महिन्यात झाडाचा पाला जास्त होईल तर तो देखील घंटा गाडी घेईल असे महानगरपालिकेचे मुकादम जावळे यांनी सुचविले. हॉस्पिटल च्या आजुबाजूला जी घरे आहेत त्यांना हॉस्पिटल मधील रुग्ण बाहेर कचरा टाकतात त्यामुळे त्रास होतो. ते कसे कमी करता येईल आणि हॉस्पिटल स्टाफ ला तशी ताकिद देण्यात आली. प्रशासनासोबत नागरिकांनी सहकार्य केले तर नक्कीच जळगाव मध्ये बदल होईल. एडव्होकेट सुचिता हाडा आणि दीपक सूर्यवंशी यांनी माझे शहर माझी जबाबदारी या संघटनेचे कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेसाचा दिल्या. या प्रसंगी गांधी रिसर्च फाउंडेशन चे सहकारी आणि जिल्हा आयकॉन मदन लाठी, डॉ लीना पाटील , सुहास दुसाने , डॉ पल्लवी राणे , डॉ कल्पेश गांधी , अँड नारायण लाठी, अजय राका, संदीप वाणी , हितेंद्र टेकवडे , प्राजक्ता चौधरी , राजेंद्र जोशी , ,सागर पाटील , वंदना सूर्यवंशी ,डॉ श्रीधर पाटील हौसिंग सोसायटी चे नागरिक बालरोग तज्ज्ञ डॉ हेमंत पाटील उपस्थित होते. नगरपालिकेची टीम आरोग्य विभाग रमेश कांबळे, मुकेश पाटील, रुपेश भालेराव, कुणाल बारसे, मुख्य स्वच्छता निरीक्षक समाधान निकम, प्रदीप धापसे, मयूर सपकाळे, सतिष करोसिया, चेतना हातागडे , उज्वल बेंन्डवाल, आरोग्य निरीक्षक कन्हैया लोंढे , जावळे , प्रशांत पवार, संदीप शर्मा , सागर पोळ, भारत विकास ग्रुपचे प्रशांत पवार, आणि इतर सुपर वायझर याचे विशेष सहकार्य लाभले.

# आष्टीत तंत्रज्ञान आणि मनोरंजनाचा 'महाकुंभ'!

## डॉक्टर स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाला लाखांहून अधिक नागरिकांची भेट







**संतोष सानप | आष्टी**

दि. 22 :- शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या संकल्पनेतून आष्टी येथे आयोजित 'डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन' सध्या जिल्ह्याचे मुख्य आकर्षण ठरले आहे. सलग तिसऱ्या दिवशीही या प्रदर्शनाला शेतकरी, महिला, तरुण आणि विद्यार्थ्यांचा विक्रमी प्रतिसाद मिळाला असून, अवघ्या तीन दिवसांत १ लाखांहून अधिक नागरिकांनी या महोत्सवास भेट दिली आहे.

यंदाच्या प्रदर्शनात १५० हून अधिक नामांकित कंपन्यांचे स्टॉल्स आहेत. यामध्ये मातीविना शेती, एआय तंत्रज्ञान, आधुनिक ठिबक सिंचन आणि प्रगत शेती अवजारांची माहिती घेण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी होत आहे. विशेष म्हणजे, 'चायनाचा सुलतान' (रेडा) हे या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण ठरत असून त्याला पाहण्यासाठी झुंबड उडाली आहे. केवळ शेतीच नव्हे, तर हे प्रदर्शन मनोरंजनाचे केंद्र बनले आहे. सायंकाळी होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांतून स्थानिक विद्यार्थ्यांनी लावणी, पोवाडे आणि लोककलेच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली. तसेच 'खाऊ गल्ली' मधील चवदार पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांनी मोठी गर्दी केली आहे.
हे प्रदर्शन २३ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार असून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले आहे.

### तरुण शेतकरी, महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

- **कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी जिल्हाभरातून तसेच आष्टी तालुक्याच्या शेजारील अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी दाखल होत आहेत. गर्दीत येणाऱ्या शेतकऱ्यांना अडचण येऊ नये, म्हणून सूचना देऊन योग्य मार्गदर्शन आयोजक करत आहेत. सदर कृषी प्रदर्शन २३ फेब्रुवारी पर्यंत सुरु रहाणार असून, शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे. हे प्रदर्शन पाहण्यासाठी गर्दीमध्ये वाढ होत आहे. यामध्ये तरुण शेतकऱ्यांसह महिला वर्गांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

### खाऊ गल्ली मुख्य आकर्षक

- **कृषी प्रदर्शनांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच खाऊ गल्ली हे मुख्य आकर्षण ठरत आहे. अस्सल देशी चवीचे पदार्थ, चटकदार भेळ, वडापाव आणि चायनीज, पिझ्झा अशा विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी खवय्यांची मोठी गर्दी होत आहे. हे प्रदर्शन शेती ज्ञानासोबतच मनोरंजनाचे केंद्र बनले आहे.**

### भव्य कृषी प्रदर्शनात आधुनिक तंत्रज्ञानासोबतच सांस्कृतिक कार्यक्रमांची उत्तम मेजवानी

- **शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी आयोजित कृषी महोत्सवात तंत्रज्ञानासोबतच मनोरंजनाचाही धमाका पाहायला मिळाला. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी व आनंद शैक्षणिक संकुलातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून लोककला, लावणी, पोवाडे आणि शेतकऱ्यांच्या यशोगाथा सांगणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली**

---

## परळीमध्ये खळबळजनक घटना

# स्व. महादेव मुंडे यांच्या मुलांना मारहाण अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल, प्रकरणी राजकीय स्तरावरही दखल

**परळी वैजनाथ :**

परळी शहरात पिंपी एरिया येथे स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या मुलांना अज्ञात तरुणांकडून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात अज्ञातांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना 19 फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास घडली. स्व. महादेव मुंडे यांच्या मुलांना काही अज्ञात मुलांनी शिवीगाळ करत मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

दरम्यान, बीड जिल्ह्यात खळबळ माजवणाऱ्या महादेव मुंडे हत्याप्रकरणाला दोन वर्षांहून अधिक काळ लोटला असतानाच त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याची चर्चा शहरात सुरू झाली आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर काही संशयितांवर लक्ष ठेवून चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून मिळत आहे. तसेच काही लोकांना संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आल्याचीही माहिती समोर येत आहे.

घटनेनंतर मुंडे कुटुंबीयांनी पोलिसांकडे धाव घेत कठोर कारवाईची मागणी केली आहे. फिर्यादीत मारहाण



करणाऱ्या मुख्य मुलाने आपल्या साथीदारांसह "बाल्या बाल्या" अशा नावाने हाक मारत हल्ला केल्याचा उल्लेख करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

स्व. महादेव मुंडे यांच्या पत्नी जानवेरी मुंडे यांनीही परळी शहर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून कुटुंबावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला आहे. या घटनेमुळे परळी शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सध्या परळी शहर पोलीस संपूर्ण घटनेचा तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून



लवकरच आरोपींना अटक केली जाईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

### खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट-

- **या प्रकरणाची गंभीर दखल घेत खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील सोशल मीडियावर पोस्ट करत घटनेबाबत चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी बीड पोलिस अधीक्षकांना पत्र लिहून मुंडे कुटुंबीयांना योग्य पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली असून घटनेची सखोल चौकशी करण्याची विनंती केली आहे.**



# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त परळी सघोष मानवंदना

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परळी वैजनाथ तर्फे मानवंदना

**परळी वै |** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 396 व्या जयंतीनिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परळी वैद्यनाथ तर्फे सघोष मानवंदना देण्यात आली. यावेळी या मानवंदनेने उपस्थित शिवप्रेमींचे लक्ष वेधून घेतले होते. या मानवंदनेसाठी स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले होते यावेळी तालुका संघचालक व तालुका पदाधिकारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले तसेच छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय या घोषणांनी परिसर अक्षरशा दणाणून गेला होता. यावेळी स्वयंसेवकांची तसेच शिवभक्तांची लक्षणीय उपस्थिती होती.

- **काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजी महाराज चौक येथे तसेच महर्षी वाल्मिकी ऋषी यांच्या जयंती निमित्त महर्षी वाल्मिकी चौक या ठिकाणी सुद्धा स्वयम् सेवकांकडून सघोष मानवंदना देण्यात आली होती.**

---




# टेंभी येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण व विविध विकास कामांची भूमिपूजन थाटात संपन्न

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील टेंभी येथे नवीन ग्रामपंचायत कार्यालयाच्या इमारतीचे लोकार्पण तसेच विविध विकासकामांच्या भूमिपूजन व उद्घाटन सोहळ्यांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा टेंभी गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल ठरले

नवीन ग्रामपंचायत कार्यालयाची भव्य व सुसज्ज इमारत ही गावाच्या प्रगतीचे प्रतीक आहे. या इमारतीमुळे ग्रामस्थांना शासकीय सेवा अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होणार आहेत. गावाच्या प्रशासनाला एक सक्षम व आधुनिक केंद्र मिळाल्याने विकासकामांना अधिक गती मिळणार आहे.याचबरोबर विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन करण्यात आले. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, वीज सुविधा, सार्वजनिक बांधकामे अशा अनेक योजनांचा शुभारंभ करण्यात आला. "गावाचा विकास हेच प्रथम कर्तव्य" या ध्येयवाक्याने प्रेरित होऊन ग्रामपंचायतीने कामाला गती दिली आहे. निधी कमी पडू देणार नाही, विकासकामे थांबू देणार नाही, असा ठाम निर्धार आमदार किसनराव वानखेडे यांनी व्यक्त केला.टेंभी गावाने ज्या पद्धतीने नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून विकास साधला आहे, तो खरोखरच इतर गावांसाठी आदर्श घेण्यासारखा आहे. स्वच्छता, पायाभूत सुविधा, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे टेंभी गावाची प्रगती उल्लेखनीय ठरली आहे.

या सर्व यशामागे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांचे एकत्रित परिश्रम आहेत. गावाच्या उन्नतीसाठी अमोल चिकणे यांनी घेतलेली मेहनत आणि गावकऱ्यांनी दाखवलेली एकजूट कौतुकास्पद आहे. त्यांच्या कार्याचे जितके कौतुक करावे तितके कमीच आहे.टेंभी गावाचा विकास हा केवळ इमारतीपुरता मर्यादित नसून तो सामाजिक, आर्थिक आणि पायाभूत उन्नतीचा आदर्श नमुना आहे. भविष्यातही अशीच प्रगतीची वाटचाल कायम राहो, हीच अपेक्षा आहे.

या सोहळ्यास आमदार किसनराव वानखेडे समवेत जिल्हा समन्वयक श्री. नितीनभाऊ भुतडा, मा.आमदार श्री. नामदेवराव ससाणे, सहकार आघाडी जिल्हाध्यक्ष श्री. बळवंतरावजी नाईक, तहसीलदार श्री. अभय मस्के, गटविकास अधिकारी श्री. दत्तात्रय कदम, ठाणेदार श्री. धनराज निळे, डॉ. इरफान कुंदन,टेंभी गावचे सरपंच श्री. अमोल चिकणे,दीपक मामा आडे, अजय मामा पुरोहित, तालुकाध्यक्ष भाजप योगेश वाजपेयी, गजानन कांबळे, महागाव शहराध्यक्ष निलेश नरवाडे, अंबादास पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष रोहित वर्मा, दत्ता काळे, मल्हार चंद्रे , बाबाराव पाटील शिरगिरे, बाबाराव सोळंके, संभाजी पावडे, पत्रकार निलेश नरवाडे, उपसरपंच पंजाबराव सोळंके, ग्रामसेवक हनुमान राजुरे,दिनेश पाटील रावते यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.